महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८१ वा | दिनांक : ०९/०९/२०२५ | वार : मंगळवार

## अजित पवार सिंचन घोटाळ्याचे खरे सूत्रधार - विजय पांढरेंचा गंभीर आरोप



**मुंबई :** अजित पवार हे राज्यातील सिंचन घोटाळ्याचे खरे सूत्रधार होते. त्यावेळी उच्चस्तरीय चौकशी नेमून त्यांच्यावर कारवाई केली असती तर अजित पवार तुरुंगात गेले असते, असे वक्तव्य विजय पांढरे यांनी केले आहे. कॉंग्रेस राष्ट्रवादीच्या आघाडी सरकारच्या काळात विजय पांढरे हे जलसंपदा विभागाचे तत्कालीन मुख्य अभियंता होते. देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांचे पाप लपवले आणि त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठिंबा दिला असल्याचा आरोप पांढरे यांनी केला आहे.

विजय पांढरे यांनी समाज माध्यमावर एक व्हिडिओ पोस्ट करत अजित पवारांवर आरोप केले आहेत. विजय पांढरे म्हणाले, अजित पवार हे सिंचन घोटाळ्याचे सूत्रधार होते. त्याप्रकरणी त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यावेळी कॉंग्रेसने अजित पवारांची चौकशी लावण्याचा प्रयत्न केला तर सरकार पाडण्यात आले. जलसिंचन खात्यातील घोटाळ्याच्या चौकशीसाठी माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक समिती नेमली होती. पण त्यावेळी चितळेंनी पळपुटेपणा केला. त्यांनी अहवालात गोष्टी होत्या तशा नीटपणे मांडल्या नाहीत. त्यामुळे सरकारला या प्रकरणात संधी मिळाली, असे पांढरे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना विजय पांढरे म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना सिंचन घोटाळ्याच्या प्रकरणात क्लीनचिट देण्याचे काम केले. सिंचन घोटाळ्यात अजित पवारांना पाठीशी घालणारी दुसरी व्यक्ती म्हणजे नरेंद्र मोदी. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अजित पवार यांना सिंचन घोटाळ्यात क्लीनचिट दिल्याची लेखी माहिती नागपूर खंडपीठासमोर दिली. मात्र, अद्याप नागपूर खंडपीठाने ती क्लीनचिट मान्य केलेली नाही. सध्या या प्रकरणाची सुनावणी होत नाही, ही खरी अडचण असल्याचे पांढरे यांनी म्हटले आहे.

माधवराव चितळे समितीने जलसिंचन घोटाळ्याच्या अहवालात भ्रष्टाचाराबाबत पुरेशा गोष्टी नमूद केल्या होत्या. माधवराव चितळे यांनी एका मुलाखतीत बोलताना सांगितले होते की, या प्रकरणात चौकशीसाठी उच्चस्तरीय चौकशी नेमली पाहिजे, अशी माहिती विजय पांढरे यांनी दिली आहे. तसेच सरकारने चितळे समितीचा अहवालही लपवून ठेवला. चितळे यांनी म्हटले होते की मी दिलेल्या अहवालानुसार कारवाई केली तर अजित पवार जेलमध्ये जातील. मात्र अजित पवारांचे जलसिंचन घोटाळ्याचे काम लपवण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले यात शंका नाही, असा आरोप पांढरे यांनी केला आहे.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी कुणबी प्रमाणपत्र द्या: अन्यथा दसरा मेळाव्यात मोठा निर्णय घेऊ - मनोज जरांगे



**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील हे सध्या रुग्णालयात दाखल असून त्यांना आज डिस्चार्ज देण्यात येत आहे. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे तसेच विनंती देखील केली आहे की मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, अन्यथा दसरा मेळाव्यात मोठा निर्णय घेऊ, असे म्हणत जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले, सरकारला एक विनंती आहे तुम्ही व्यासपीठावर सांगितले होते की हैदराबाद गॅझेट आपण लागू केले आहे. मला तुम्हाला स्पष्ट सांगणे आहे तुम्हाला काय करायचे काय नाही ते तुम्ही बघा, १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आहे, त्याआधी हैदराबादच्या गॅझेटच्या नुसार मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू केली पाहिजे. येत्या कॅबिनेटमध्ये आपण ही प्रक्रिया सुरू करावी आणि अंमलबजावणी करण्यात यावी. १७ सप्टेंबरच्या आधी ही प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आहे.

तुम्ही ठरवलेच आहे तर मनुष्यबळ द्या, तातडीने कामाला लावा आणि हैदराबाद गॅझेटच्या नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करावी अन्यथा मला मोठे पाऊल घ्यावे लागेल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. आमची हेळसांड झाली तर पुन्हा खूप वाईट दिवस तुमच्या चुकीमुळे आली नाही पाहिजे. मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या म्हटले की अर्धा महाराष्ट्र पागल झाला. म्हणजे गरिबांच्या पोरांनी आणि मी आम्ही जीआर काढला तेव्हा काही अभ्यासक सुद्धा पागल झाले. आमचे विरोधक तर इतके पागल झाले आहेत की त्यांना झोपाच येत नाहीत. मराठवाडा शंभर टक्के आरक्षणात जाणार.

एकदा आपले सगळे मराठे आरक्षणात जाऊ द्या त्यानंतर आणखी मोठा आनंद साजरा करू. त्यामुळे मराठ्यांनी थोडे संयमाने घ्या. १७ सप्टेंबरच्या आधी जर मराठवाड्यातल्या मराठ्यांना जर कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू नाही झाली तर येत्या दसरा मेळाव्याला आम्हाला आमची भूमिका जाहीर करावी लागेल सरकारच्या विरोधात. कारण आता मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की आम्ही हैदराबाद गॅझेट लागू केले. तर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी प्रमाणपत्र देण्याची सुरुवात करावी.

## अधिकाऱ्यांच्या मानेवर तलवार ठेवून जात प्रमाणपत्र काढता येत नाही - चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई :** ओबीसी समाजातल्या ताटातले आरक्षण हे दुसऱ्यांच्या ताटात जाणार नाही, याची काळजी सरकारने घेतली आहे. मात्र, दुसरीकडे अधिकाऱ्यांच्या मानेवर तलवार ठेवून कोणालाही जात प्रमाणपत्र काढता येत नाही. त्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्र जमा करावी लागतील. पुरावे द्यावे लागतील, अशा शब्दात भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना सुनावले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी १७ सप्टेंबरपर्यंत दिलेल्या इशाऱ्याला देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, ओबीसीच्या ताटातले आरक्षण हे दुसऱ्यांच्या ताटात जाणार नाही, याची काळजी सरकारने घेतली आहे. सरकार ओबीसींची काळजी घेत आहे. ओबीसीसाठी जे जे करणे शक्य आहे, ते सर्व निर्णय आपण घेत आहोत. या संदर्भात कॅबिनेट उपसमितीची बैठक १० तारखेला सकाळी ११ वाजता बोलावण्यात आली आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणासंदर्भात विजय वडेट्टीवार यांच्या मनात काही शंका असतील तर त्यांनी उपसमिती समोर मांडाव्यात. या बैठकीत त्यावर विचार केला जाईल. केवळ याचा राजकीय फायदा किंवा राजकीय स्टंट करून कॉंग्रेस पक्ष राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. ओबीसींचे नुकसान होत असेल तर उपसमिती योग्य निर्णय घेईल, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे.

अधिकाऱ्यांच्या मानेवर तलवार ठेवून जात प्रमाणपत्र काढता येत नाही. जी कागदपत्र आहेत, ती कागदपत्र अर्जासोबत जमा करावी लागतील, ती दिल्यानंतरच प्रमाणपत्र मिळेल. ओबीसी प्रमाणपत्र द्यायचे असेल तर किंवा इतर कोणतेही प्रमाणपत्र द्यायचे असतील, तर प्रमाणपत्र देताना विभागाच्या वतीने त्या प्रमाणपत्र देताना काही फॉरमॅट असतो. त्यासाठी लागणारे कागदपत्रांची यादी असते. अर्जाचे नमुने आहेत. त्यासाठीची कागदपत्र लागतात. ती सर्व जमा करावी लागतील, त्यानंतर प्रमाणपत्र वितरित करता येतात. प्रमाणपत्र देताना आधी कुणबी नोंदणी आहे, त्याचा दाखला द्यावा लागणार असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी १७ सप्टेंबर पर्यंत ओबीसी प्रमाणपत्र न मिळाल्यास पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्याला बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ सप्टेंबर २०२५


## गट ग्रामपंचायत निरगुडी (बु.) मध्ये चक्क दोनशेच्या वर मुलांची जन्म नोंदणी नसल्याने पालकांनी संताप व्यक्त केला




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : खुलताबाद तालुक्यातील ग्रामपंचायत निरगुडी बुद्रुक मधील ९० ते ९५ टक्के आदिवासी गाव असलेल्या ठाकरवाडी भिलवाडीतील चक्क दोनशेच्या वर मुलांची जन्म नोंदच ग्रामपंचायत मध्ये आढळून आली नाही शासनाच्या नवीन नियमानुसार जन्म दाखला आणि शाळेतील मुले हजेरीपटावरील ऑनलाईन करण्यासाठी आधार कार्ड सक्तीचे केल्याने ठाकरवाडीतील पालक ग्रामपंचायत मध्ये जाऊन जन्म दाखला घेण्यासाठी विचारणा केली असता ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक,सरपंच यांनी पालकांना सांगितले की, तुमच्या मुलांची ग्रामपंचायत मध्ये जन्म नोंद नाही व नोंद नसल्यामुळे जन्म दाखला मिळणार नाही असे सांगण्यात आले तेव्हा या आदिवासी ठाकर,भिल्ल समाजाच्या व्यक्तींची/पालकांनी संताप व्यक्त केला या भोळ्या भाबड्या आदिवासी ठाकर, भिल्ल समाजाने अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्याकडे जन्मदिनांक नोंदणीसाठी दिली होती ग्रामपंचायत मधील कर्मचा-यांनी नोंदणी करून घेतली नाही जन्म नोंदणी झाली आहे अशा या कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर पालक/गावकरी राहिले परंतू जन्म नोंदणी केलीच नाही त्यामुळे ठाकर वाडी,भिलवाडीतील मुलांच्या जन्म दाखल्यासाठी पालकांची धावपळ सुरू झाली आहे.

## संदीप वाकडे यांना लायन्स क्लब ऑफ छ. संभाजीनगर आयडल टीचर अवॉर्ड प्रदान




**कन्नड (अरुण थोरात)** : खेडा ता. कन्नड येथील रहिवासी व चापानेर येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चे उपप्राचार्य संदीप नानासाहेब वाकडे यांना यावर्षीचा आयडल टीचर अवार्ड मान्यवरांचे उपस्थिती प्रदान करण्यात आला.छ. संभाजीनगर शहरातील महानगरपालिका शाळा गारखेडा येथे दि.०८ सप्टेंबर रोजी संपन्न झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर उपयुक्त नंदकिशोर जी भोंबे ( उपायुक्त घनकचरा विभाग), अंकुश पांढरे ( उपायुक्त शिक्षण विभाग ), तनसुख झांबड ( पूर्व प्रांतपाल) या मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती संभाजी नगर शहर व जिल्ह्यातील गुणवंत शिक्षकांचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. एवढी जिल्ह्यातील गुणवंत शिक्षकांना सोबतच चापानेर येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूलचे संदीप वाकडे यांनाही शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी हिताच्या कार्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध कवियत्री व लायन्स क्लबच्या कार्यक्रम संयोजिका माधुरी चौधरी , लायन्स क्लबचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, सचिव आशा कटके आदींसह लायन्स क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. संदीप वाकडे यांचे या पुरस्काराबद्दल कस्तुरबा इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष दशरथ सोमासे, प्राचार्य कौशल्या सोमासे, खेडा गावचे सरपंच निवृत्ती शेळके, शाळेतील सर्व शिक्षक वृंद , भाषा साहित्य व संशोधन परिषद शाखा कन्नडचे सर्व सदस्य व पालक वर्गाने अभिनंदन केले.

## आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित वक्तृत्व स्पर्धा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर** : येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित वक्तृत्व स्पर्धेसाठी संविधान साक्षरता आणि वर्तमान समाज, प्रसार माध्यमांचा वापर व साक्षरता, ऑनलाईन आर्थिक व्यवहार व साक्षरता ,सायबर गुन्हे युवक आणि साक्षरता, जातीयवाद , धर्मांधता, धर्मनिरपेक्ष साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन आणि साक्षरता असे विषय ठेवण्यात आला होते. प्रारंभी कार्यक्रमाधिकारी डॉ. नवनाथ गोरे स्पर्धा व आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित प्रास्ताविक केले स्पर्धेत साक्षी संजय जाधव हिने प्रथम, सावित्री गंगाधर सरवदे हिने द्वितीय तर आशित संदाशिव याने तृतीय क्रमांक पटकावला . स्पर्धेचे संयोजन डॉ. आरती पांडे यांनी केले , स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. समाधान वाघमारे व डॉ. संजय खरात यांनी केले त्यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले . अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य प्रा.एन. एम. करडे यांनी साक्षरतेचे विविध प्रकार व उपयोजन कसे करावे याविषयी माहिती दिली. सदर स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. गौतम घाडगे यांनी तर आभार डॉ. पूजा वडमारे यांनी केले , यावेळी डॉ. प्रज्ञा रूईकर साळवे, डॉ. संदिप गवई, डॉ. दिपा गायकवाड, डॉ. खाडे मॅडम, डॉ. बावस्कर मॅडम , डॉ. अमित कांबळे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ सप्टेंबर २०२५


## शिवाजी महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा




**कन्नड :** दि ८ सप्टेंबर २०२५ कन्नड शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे ८ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इंग्रजी विभागामार्फत स्वयंशासन दिनाचे आयोजन करण्यात आले.यात ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत एक दिवस शिक्षक होऊन अध्यापनाचा घेतला.शिक्षक सत्कार समारंभात विद्यार्थ्यांनी आपल्या सर्व गुरूंचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.पुस्तकी ज्ञाना बरोबर विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारी मूल्य रुजविण्याचे कार्य गुरुजन करीत असतात असे मत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्ही एन भोसले यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जान्हवी गाडे,सूत्रसंचालन साक्षी भिंगारे, साक्षी ठोंबरे व आभार प्रदर्शन तुषार भोसले यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी के मगर सर, नॅक समन्वयक डॉ विजय मातकर, प्रा अशोक भोसीकर,प्रा अतिश मेहत्रे ,प्रा राकेश अहिरराव ,प्रा सलीम शेख,महाविद्यालयिन प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा ज्योतीराव फुले विद्यालय येथे तालुकास्तरीय खो-खो क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन



**पिशोर (कृष्णा शिंदे) :** तालुका क्रीडा समिती व महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिशोर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता.08) तालुकास्तरीय खो खो क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन आमदार संजनाताई जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच सरला डहाके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. सोमवारी व मंगळवारी दोन दिवस या स्पर्धा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या मैदानात पार पडणार आहेत. आमदार जाधव यांनी यावेळी शालेय जीवनात खेळाचे महत्व विषद केले. खेळाकडे शाळेने आणि क्रीडा विभागाने सुद्धा विविध क्रीडा प्रकाराकडे विशेष लक्ष द्यावे असे आवाहन त्यांनी केले. मी स्वत: खेळातील कौशल्य वापरून राजकारणात यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले. या स्पर्धेत तालुक्यातील एकूण 85 संघानी सहभाग नोंदवला आहे.या उद्‌घाटन समारंभासाठी तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य प्रविण शिंदे तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोसावी, क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे,सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे, संस्थेचे अध्यक्ष के. आर. नवले, माजी पंचायत समिती सदस्य दिलीप नवले, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदाम मोकासे, माजी सरपंच पी. एम. डहाके, माजी उपसरपंच एन ए जाधव, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मोकासे , पंच कडुबा चव्हाण, रविकुमार सोनकांबळे, प्रशांत नवले, राज्य स्तरीय थ्रो बॉल प्रशिक्षक विशाल दांडेकर, एजाज शहा, राष्ट्रीय कुस्ती पंच विजयसिंह बारवाल, वासिम शेख, राहूल दनके, करण राठोड, क्रीडा शिक्षक, शाळेचे शिक्षक, प्राध्यापक, वृत्तपत्र प्रतिनिधी, कर्मचारी उपस्थित होते.

## माळीवाडा येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत स्थानिक पातळीवरील विविध समस्या, नागरिकांच्या मुलभूत सोयीसुविधा तसेच समाजातील सर्वसामान्यांच्या अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आलेयावेळी पक्षाचे अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन यांनी सांगितले "अन्यायाविरुद्ध आम्ही कायम तुमच्या सोबत खंबीरपणे उभे राहू. स्थानिक पातळीवरील कोणतीही समस्या दुर्लक्षित केली जाणार नाही. नागरिकांच्या हक्कासाठी पक्ष सदैव कटिबद्ध आहे.”या बैठकीचे आयोजन माळीवाडा अध्यक्ष रवि सोळस यांनी केले होते, प्रमुख पाहुणे म्हणून कारभारी गायकवाड, पश्चिम तालुका अध्यक्ष रवींद्र दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.या प्रसंगी उपाध्यक्ष सोमनाथ साठे सचिव दीपक शिनगारे सल्लागार लक्ष्मण गायकवाड उपाध्यक्ष विजय धनके गणेश साबळे आदिंसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.बैठकीदरम्यान नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहचवून त्यावर तोडगा काढण्यासाठी ठोस भूमिका घेण्यात आली.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ सप्टेंबर २०२५


## दोन दुचाकी भिडल्या तीन जण जखमी









**दौलताबाद (जावेद अहमद)** : छत्रपती संभाजीनगर - नाशिक महामार्गावर माळीवाडा येथे अपघात.दुपारी च्या SBI बँकेच्या समोर दुचाकी क्र स्टार सिटी MH.२०.CV.८००४ व बजाज पल्सर क्र MH.२०.CN.१९४६ या दोघांची समोरासमोर धडक झाली आहे.समिर सलीम शेख, वय-25, रा:- माळीवाडा, ता, जि:- छत्रपती संभाजीनगर. (2) श्रीहरी कचरु सांगळे, वय-50, (3) कारभारी किसन सांगळे, वय-70, रा. वंजारवाडी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर.हे जखमी झाले त्यांना जगतगुरु नरेंद्र महाराज संस्थांची रुग्णवाहिका ने उपचारासाठी संभाजी नगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दौलताबाद माळीवाडा परिसरात एकच राष्ट्रीयकृत बँक असल्याने २५ ते ३० गावातील ग्राहक या बँकेवर अवलंबून आहेयामुळे येथे मोठ्या प्रमाणावर वाहनाची गर्दी असते शिस्तबद्ध वाहने न लावल्यामुळे व रस्त्यावर वाहने उभी केलेली असल्याने नेहमीच अपघात होत असल्याचे नागरिकानी सांगितले आहे

## बेरडवाडी शाळेत आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : बेरडवाडी, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती रविवारी (ता. ७) रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतराव मंडले होते. यावेळी उपाध्यक्ष रंजीतकुमार भोकले, उपसरपंच दशरथ मंडले, पोलीस पाटील काशिनाथ वासुदेव, शिवाजी मंडले, चंद्राम भोसले, चंद्राम मंडले, भालचंद्र मंडले, रंगुबाई वासुदेव, सपना मंडले आदींची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापक अनिल मुडमे, सहशिक्षक सुनिल राठोड, युवराज चव्हाण, बालाजी भालेराव, सहशिक्षिका रंजना तांदळे, युवा प्रशिक्षणार्थी राधिका मंडले आदींनी पुढाकार घेतला. याप्रसंगी सुनिल राठोड यांनी आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या शौर्यपूर्ण कार्याचा आढावा घेताना म्हणाले की, इंग्रजांविरुद्ध दिलेल्या लढ्याची, त्यागाची आणि बलिदानाची आठवण करून देत विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा, असे आव्हान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज चव्हाण तर आभार अनिल मुडमे यांनी मानले. गावातील बहुसंख्येने नागरिक, पालक उपस्थित होते.






## पुण्याच्या अश्विनी केदारीचा दुर्दैवी मृत्यू: पीएसआय परीक्षेत राज्यात अव्वल, पण आयुष्याची झुंज ठरली अपयशी



**पुणे** : पुण्याच्या खेड तालुक्यातून एक हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. पाळू गावची अश्विनी केदारी ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२३ च्या PSI परीक्षेत मुलींमध्ये राज्यात पहिली आली होती. तिच्या यशामुळे संपूर्ण तालुक्यात आनंद आणि अभिमानाची लहर पसरली होती. मात्र, नशिबाने साथ दिली नाही आणि तिच्या आयुष्यात अचानक दु:खाचा डोंगर कोसळला.

मिळालेल्या माहितीनुसार, २८ ऑगस्ट रोजी पहाटे अश्विनीने अंघोळीसाठी पाणी तापवायला ठेवले होते. पाणी किती गरम झाले, हे पाहण्यासाठी ती बाथरुममध्ये गेली असता, तिला हीटरचा शॉक लागला आणि उकळते पाणी तिच्या अंगावर सांडले. यामध्ये ती तब्बल ८० टक्के भाजली. गंभीर अवस्थेत तिला पिंपरी-चिंचवड येथील डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मागील अकरा दिवसांपासून ती मृत्यूशी झुंज देत होती, पण उपचार सुरू असतानाही अखेर तिचे निधन झाले.

ही घटना ऐन गणेश विसर्जनाच्या काळात घडल्याने तालुक्यात शोककळा पसरली. तिच्या कर्तृत्वामुळे ती अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरली होती. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवक-युवतींकडून तिच्या जाण्यावर हळहळ व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२३ च्या बॅचमध्ये पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत अश्विनी केदारीने राज्यातून मुलींमधून पहिले येण्याचा बहुमान पटकावला होता. अश्विनीच्या अचानक जाण्याने तिच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ सप्टेंबर २०२५

# निझाम कालीन मराठवाड्यातील रेल्वे लाईन

**प्रस्तावना**

मराठवाडा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रदेश निझाम कालीन हैदराबाद संस्थानाचा अविभाज्य भाग होता. जवळजवळ दोन शतकांच्या कालावधीत निझाम कालीन प्रशासनाने मराठवाड्यात अनेक घडामोडी घडवून आणल्या. त्यामध्ये वाहतूक व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाला विशेष महत्त्वाचे स्थान होते. एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण जगभर रेल्वे जाळ्याचा झपाट्याने विस्तार झाला. भारतात ब्रिटिश सत्तेच्या प्रभावामुळे आणि स्थानिक संस्थानिकांच्या प्रयत्नांमुळे नवे रेल्वे मार्ग उभारले गेले. त्याचाच थेट परिणाम निझाम कालीन मराठवाड्यात दिसून आला. हैदराबाद स्टेट रेल्वेची स्थापना हा या प्रदेशातील वाहतूक व्यवस्थेतील क्रांतिकारी टप्पा ठरला. रेल्वे स्थापनेमागे प्रशासनिक नियंत्रण अधिक मजबूत करणे, व्यापारी देवाणघेवाण सुलभ करणे, लष्करी हालचालींना गती देणे आणि धार्मिक-सांस्कृतिक स्थळांपर्यंत सहज पोहोच उपलब्ध करणे अशी प्रमुख उद्दिष्टे होती. या रेल्वे मार्गामुळे कृषी उत्पादनांना नवे बाजारपेठा उपलब्ध झाल्या, व्यापाराचा विस्तार झाला, शैक्षणिक व सामाजिक चळवळींना चालना मिळाली. तसेच मराठवाडा देशातील इतर भागांशी जोडला गेला आणि स्वातंत्र्यलढ्याच्या विचारधारा या भागात झपाट्याने पोहोचल्या. भारतामध्ये १८५३ मध्ये मुंबई—ठाणे या मार्गावर पहिली रेल्वे धावू लागली आणि त्या नंतर अल्पावधीतच देशभरात रेल्वे जाळ्याचा झपाट्याने विस्तार होऊ लागला. या बदलांचा परिणाम संस्थानिक राज्यांवरही झाला. त्याच पार्श्वभूमीवर निझामांनी आपल्या हैदराबाद संस्थानात रेल्वे उभारण्याचा निर्णय घेतला. १८७० च्या दशकात ब्रिटिश सरकारशी करार करून हैदराबाद गॅरंटी स्टेट रेल्वे या नावाने या कामाची सुरुवात करण्यात आली.

निझामांच्या दृष्टीने रेल्वे ही केवळ प्रवासाची सुविधा नव्हती, तर संपूर्ण प्रशासनिक रचनेला गती देणारे साधन होती. विशाल आणि विविध भौगोलिक रचनेच्या हैदराबाद संस्थानात जलदगतीने लष्करी हालचाली करणे, प्रशासनाचे नियंत्रण अधिक मजबूत करणे आणि व्यापारी देवाणघेवाण वाढवणे, या उद्देशाने रेल्वेचा विचार करण्यात आला. रेल्वेच्या माध्यमातून मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटकातील कृषी व औद्योगिक उत्पादनांची बाजारपेठ वाढेल, हा निझाम सरकारचा विश्वास होता. याचबरोबर ब्रिटिश सरकारचे राजकीय व सामरिक हितसंबंधही या माध्यमातून साधले जात होते. निझाम मीर महेबुब अली खान (इ. स. १८६९ ते १९११) आणि मीर मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद राज्यामध्ये रेल्वे प्रणाली विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**मराठवाड्यातील प्रमुख रेल्वे मार्ग**

हैद्राबाद-गोदावरी व्हॅली रेल्वेची स्थापना निझाम सरकारने, हैद्राबाद राज्याच्या हमीखाली कार्यरत असलेल्या निजाम गॅरंटीड स्टेट रेल्वेचा एक भाग म्हणून केली होती. १८९९ ते १९०१ या काळात राज्यामध्ये एकूण ४६७ मैल (७५२ किमी.) ब्रॉडगेज आणि ३९१ मैल (६२९ किमी.) मीटर गेज रेल्वेचे जाळे तयार करण्यात आले. मीटर गेज रेल्वेचा हा मुख्य मार्ग हैद्राबाद शहरातून सुरू होऊन मनमाडपर्यंत पोहोचत असे आणि सुमारे ३९२ मैल (६२९ किमी.) अंतर कापून इंडियन पेनिन्सुला रेल्वे लाईनला जोडत असे.

**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) :** जिल्ह्यात ही रेल्वे पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरली होती आणि तिचे अंतर साधारण ९६ मैल (१५४ किमी.) होते. इ.स. १९०९ पर्यंत छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यात तब्बल अकरा स्थानके उभी राहिली होती. या काळात हैद्राबाद-गोदावरी व्हॅली रेल्वे हीच मुख्य वाहतूक धुरा होती.

**परभणी:** जिल्ह्यात या रेल्वे लाईनने पूर्वेकडून पश्चिमेकडे ६३ मैल (१०१ किमी.) अंतर व्यापले होते. १९०९ पर्यंत येथे नऊ स्थानके सुरू झाली होती. यानंतर इ.स. १९१२ मध्ये पूर्णा ते हिंगोली या ५० मैल लांबीच्या मार्गाचे काम पूर्ण झाले आणि परभणीला अधिक व्यापक रेल्वे जोडणी मिळाली. इ. १९२९- ३० मध्ये परभणी ते गंगाखेड आणि गंगाखेड ते परळी वैजनाथ ही रेल्वे लाईन टाकण्यात आली होती.

**नांदेड :** जिल्ह्यात या रेल्वेची लांबी सुमारे ४० मैल (६४ किमी.) होती. १९०९ पर्यंत येथे सहा स्थानके अस्तित्वात होती. नंतर मुदखेड (नांदेड) ते आदिलाबाद (तेलंगणा) दरम्यान १०१ मैल लांबीच्या मार्गाचे बांधकाम सुरू झाले आणि इ.स. १९४२ नंतर हा प्रकल्प पूर्ण झाला.

**उस्मानाबाद :** जिल्ह्यातील परिस्थिती काहीशी वेगळी होती. येथे ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेची लाईन जवळून जात असे. सोलापूर-बॉम्बे मार्गावरील बार्शी हे उस्मानाबाद जिल्हा मुख्यालयापासून फक्त ३२ मैल अंतरावरील जवळचे स्टेशन होते.

**बीड:** इ. १९३० पासून सरकारने रेल्वे विस्तारावर भर दिला आणि विकाराबाद-बीदर रेल्वेमार्गाचा विस्तार परळी वैजनाथपर्यंत (११० मैल) वाढविला. १९३७—३८ या काळात मराठवाड्याच्या दळणवळणाच्या विकासासाठी छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद)-बीड-परळी वैजनाथ या रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणावर तब्बल १,०९,२८२ रुपये खर्च झाले होते, परंतु ही महत्त्वाकांक्षी योजना प्रत्यक्षात अमलात आली नाही. तरीसुद्धा, या मार्गासाठी सरकार प्रयत्नशील होते. त्याच काळात मुदखेड (नांदेड) ते आदिलाबाद रेल्वेमार्गाच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

निजामकाळात मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणणारा महत्त्वाचा टप्पा म्हणजे गोदावरी व्हॅली रेल्वे होय. हैदराबाद राज्याची राजधानी असलेल्या सिकंदराबादला महाराष्ट्रातील मनमाडशी जोडणारा हा महत्त्वपूर्ण मार्ग होता. हा संपूर्ण मार्ग मीटर गेज रेल्वे स्वरूपात उभारण्यात आला. या रेल्वेच्या माध्यमातून निजाम राज्याला व्यापारी आणि सामरिक अशा दोन्ही प्रकारचे फायदे मिळावेत, हा प्रमुख हेतू होता. या रेल्वेमुळे हैदराबाद राज्याचा व्यापारी नकाशा अधिक विस्तारला आणि मराठवाडा हा त्यातील एक महत्त्वाचा दुवा ठरला.

गोदावरी व्हॅली रेल्वेच्या उभारणीचे काम उशिरा १९व्या शतकात सुरू झाले आणि १९००—१९०१ या काळात या रेल्वे लाईनवरून गाड्या धावू लागल्या. हा मार्ग सुमारे ६२९ किलोमीटर लांबीचा होता. त्याकाळी या रेल्वेच्या बांधकामासाठी निजाम सरकारने २.५ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च केला होता, जी त्या काळातील प्रचंड मोठी रक्कम मानली जाते. या माध्यमातून निजामांनी या प्रकल्पाला किती महत्त्व दिले होते हे स्पष्टपणे दिसून येते.

या मार्गावर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), जालना, परभणी, सेलू आणि नांदेड ही प्रमुख स्थानके होती. ही सर्व ठिकाणे व्यापारी, शैक्षणिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाची असल्यामुळे रेल्वे सुरू झाल्यानंतर या भागांमध्ये व्यापार व्यवहारांना नवे परिमाण मिळाले. कापूस, धान्य, कडधान्ये, गुळ आणि तेलबिया यांसारखी पिके मोठ्या प्रमाणावर या मार्गाने बाह्य बाजारपेठेत पोहोचू लागली. यामुळे ग्रामीण शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी थेट बाजारपेठ उपलब्ध झाली आणि व्यापाराची गती वाढली.

गोदावरी व्हॅली रेल्वेने मराठवाड्याच्या आर्थिक जीवनात एक मोठा बदल घडवून आणला. रेल्वे स्थानकांच्या आजूबाजूला नवीन बाजारपेठा आणि वसाहती उभ्या राहिल्या, ज्यामुळे शहरीकरणाची प्रक्रिया वेगाने घडू लागली. या रेल्वेमुळे सामाजिक जीवनातही बदल झाले. यात्रेकरूंना नांदेडमधील गुरुद्वारा, परळी वैजनाथचे मंदिर किंवा छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद )जवळील अजिंठा-वेरूळ गुंफा यांसारख्या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांपर्यंत पोहोचणे सुलभ झाले. गोदावरी व्हॅली रेल्वे ही केवळ वाहतूक व्यवस्था म्हणून मर्यादित राहिली नाही, तर ती मराठवाड्याच्या आधुनिकीकरणाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरली. ६२९ किलोमीटर लांबीचा हा मार्ग मराठवाड्याला देशाच्या व्यापारी आणि सांस्कृतिक नकाशावर ठळकपणे अधोरेखित करणारा ठरला. त्यामुळे निजाम कालीन गोदावरी व्हॅली रेल्वे हा मराठवाड्याच्या इतिहासातील एक निर्णायक अध्याय मानला जातो.

निजामकालीन रेल्वे ही मराठवाड्याच्या इतिहासातील एक महत्त्वाची पायरी ठरली. या रेल्वेचे राजकीय आणि प्रशासकीय महत्त्व प्रचंड होते. रेल्वे मार्गांच्या साहाय्याने निजाम सरकारला आपल्या राज्याच्या दूरवरच्या भागांवर सहज नियंत्रण ठेवता आले. सैनिकी हालचालींना गती मिळाली, करसंकलन आणि प्रशासनातील काम अधिक कार्यक्षम झाली. त्यामुळे रेल्वे ही केवळ वाहतुकीचे साधन नसून निजामशाही सत्तेचे प्रभावी हत्यार ठरली. या रेल्वेने स्वातंत्र्यलढ्यात देखील विशेष भूमिका बजावली. रेल्वे मार्गांनी कार्यकर्त्यांना आपले विचार, संदेश आणि साहित्य दूरवर पसरविण्यास मदत केली. गुप्त सभा, बैठका आणि आंदोलनाचे नियोजन रेल्वेच्या साहाय्याने करणे शक्य झाले. ब्रिटिशविरोधी तसेच हैद्राबाद मुक्तिसंग्रामाशी निगडित लढ्यांना या रेल्वेने वाहतुकीचे आधार दिले. निजामकालीन रेल्वेने मराठवाड्याच्या आधुनिकीकरणाचा पाया घातला आणि आजची रेल्वे ही त्या विकासप्रक्रियेचा एक भाग ठरत आहे. 77 वर्षे झाली तरी मराठवाड्यात रेल्वेच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. निजामकालीन काळात जी गोदावरी व्हॅली रेल्वे किंवा इतर रेल्वे लाईन मार्ग उभारली गेली, तिने व्यापारी, प्रशासकीय आणि सामाजिक जीवनाला गती दिली. पण स्वातंत्र्यानंतर, विशेषतः मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर, रेल्वेच्या नव्या लाईन्स उभारण्याबाबत ठोस प्रयत्न झाले नाहीत. 77 वर्षांमध्ये फक्त अहमदनगर - बीड-परळी वैजनाथ या रेल्वे लाईन चे कार्य हाती घेण्यात आले आहे 77 वर्षांपासून बीड हे शहर रेल्वे वाहतूक पासून वंचित होता.



डॉ. शेख इस्माईल महेबूब
एम. ए. इतिहास, सेट, नेट, पीएच डी
मो. 9561869402

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002